# शालेय वार्षिक अहवाल २००८-०९

२२ डिसेंबर २००९ रोजी आपल्या प्रशालेचे प्रयोगशाळा सहाय्यक व सहकारी श्री. सुभाष विजपूरकर सर यांचे आकस्मिक दुख:द निधन झाले. आपणा सर्वांच्यावतीने त्यांना मन:पूर्वक श्रध्दांजली.

आमची रा.भा. शिर्के प्रशाला ही रत्नागिरी जिल्ह्यातील एक अग्रगण्य शाळा आहे असे असताना खरोखरच आनंद व अभिमान वाटतो. प्रशालेची १५१८ विद्यार्थ्या संख्या असून २५ तुकड्या आहेत.

**१) एस.एस.सी. मार्च २००८** मध्ये झालेल्या एस.एस.सी. परीक्षेचा निकाल ९४.४०% इतका लागला. २८६ विद्यार्थ्यापैकी २७० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यातील विशेष योग्यता श्रेणीत ८४, प्रथम श्रेणीत ७१ उत्तीर्ण झाले. विद्यालयातील विद्यार्थिनी कु. सिध्दी श्री.आठल्ये ही ९२.६१% गुण मिळवून प्रथम, कु. ऋचा अतुल पित्रे ९२.४६% गुण मिळवून द्वितीय, तर कु. रुपाली अशोक पाष्टे ९२.३०% गुण मिळवून विद्यालयात तिसरी आली.

**२) माध्यमिक शिष्यवृत्ती** २००७-०८ या शैक्षणिक वर्षाध्ये माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेस प्रशालेचे ६९ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १२ विद्यार्थी अनुपस्थित, ४३ विद्यार्थी उत्तीर्ण, १४ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले. प्रशालेचा शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल ६२.३२% लागला. त्यापैकी ८ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता श्रेणी मिळवली. त्यांची नांवे खालील प्रमाणे.

| अ. क्र. विद्यार्थ्यांचे नाव | गुण | गुणवत्ता क्रमांक |
|---|---|---|
| १. दांडेकर निखिल किशोर | | २५८ ०५ |
| २. मारुलकर अक्षय प्रमोद | २५८ | ०५ |
| ३. दामले भक्ती सतीश | २५७ | ०६ |
| ४. ढवळे सुभाष दिलीप | २४४ | १६ |
| ५. भावे अक्षय मोहन | २३७ | २१ |
| ६. सावंत चित्रांक श्रध्दानंद | २३२ | २४ |
| ७. देवरुखकर अंकिता लक्ष्मण | २२६ | २९ |
| ८. गायकवाड अविनाश रमेश | २२४ | ३१ |

मार्गदर्शक शिक्षक :
मराठी - सौ. बागवे ए. एस. व सौ. पवार
गणित - श्री. शेलार एम. के. व सौ. साखळकर
बुध्दिमत्ता - श्री. पडवेकर एस. एस. व सौ. अभ्यंकर

**३) महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे यांच्या बालबोधिनी,**
प्राथमिक प्रवेशिका, सुबोध या परीक्षांना १२३ विद्यार्थी प्रविष्ठ झाले.या परीक्षांचा निकाल १००% इतका लागला. राष्ट्रभाषा हिंदी प्रचार व प्रसार समिती आयोजित वक्तृत्व स्पर्धेत कु. अनुज आखाडे हिची राष्ट्रीय स्तरावर निवड झाली.

४) महाराष्ट्र विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या इंग्रजी विषयाच्या प्री-एलिमेंटरी, एलिमेंटरी, ज्युनिअर व सिनिअर या परीक्षा घेण्यात आल्या. अनेक विद्यार्थ्यांनी विशेष गुणवत्ता प्राप्त केली.

**५) गणित विभाग -**
रत्नागिरी जिल्हा अध्यापक मंडळातर्फे शुक्रवार दि.५ डिसेंबर २००८ रोजी घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय गणित प्रश्नमंजुषा स्पर्धेध्ये घवघवीत यश संपादन केले. दोन विद्यार्थ्यांचा एक गट याप्रमाणे इ. १० वीतील ६ विद्यार्थ्यांचे तीन गट सहभागी झाले होते. त्यांना पुढीलप्रमाणे गुणानुक्रम प्राप्त झाले.
प्रथम क्रमांक - हर्ष हेंत खेर व कौस्तुभ सुरेश वरेकर
द्वितीय क्रमांक - प्रतिक प्रकाश चव्हाण व वैभव विनय पाष्टे
मार्गदर्शक शिक्षक : श्री. ढोले, श्री. के. डी. कांबळे, श्री.रहाटे व श्री. वासावे.
शैक्षणिक वर्ष २००८-०९ साठी घेतल्या गेलेल्या गणित ऑलिंपीआड स्पर्धा परीक्षेसाठी इ. ८ वीतील ४,९ वीतील १५ तर १० वीतील ५ विद्यार्थी प्रविष्ठ झाले.

६) **संस्कृत विभाग**- संस्कृत विभागातर्फे नाट्य स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त झाला. अथर्वशीर्ष, भगवदगीता ६ वा अध्याय पाठांतर तसेच संस्कृत नाटिका, संस्कृत गीते सादर करुन संस्कृत दिन साजरा करण्यात आला.

**७) विज्ञान समिती अहवाल -**
**अ) शालांगर्तत विज्ञान प्रदर्शन** - दरवर्षीप्रमाणे फेब्रुवारी २००८ मध्ये विज्ञान दिनानिमित्त १३, १४, १५ फेब्रुवारी या कालावधीत शालांगर्तत विज्ञान प्रदर्शन संपन्न झाले. प्रदर्शनात इ.५ वी ते इ. ९ वी मधील ८० विद्यार्थ्यांनी ३५ प्रकल्प मांडले. प्रदर्शनाचे उद्घाटन शाळेचे मुख्याध्यापक श्री. कांबळे सर यांनी केले. प्रत्येक गटात तीन क्रमांकांना बक्षिसे व प्रशस्तीपत्रके देण्यात आली. विज्ञान प्रदर्शनातील प्रकल्पांचे परीक्षण अ. के. देसाई हायस्कूल, रत्नागिरी या शाळेचे विज्ञान शिक्षक श्री. अे. अे. पाटोळे व श्री. शां. य. गोडबोले हायस्कूल केळ्ये या शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम.आर.एम.सुर्वे मॅडम यांनी केले. प्रदर्शन यशस्वी होण्यासाठी मा. मुख्याध्यापक, सर्व विज्ञान शिक्षक, पर्यवेक्षक आणि पालक यांनी सहकार्य केले.
**ब) डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षा** : सप्टेंबर मध्ये झालेल्या लेखी परीक्षेसाठी प्राथमिक गटात २५ व माध्यमिक गटात १ असे २५ विद्यार्थी सहभागी झाले. प्राथमिक गटात कु. चैतन्य श्रीरंग वैद्य, कु. कौस्तुभ उमेश जेशी आणि माध्यमिक गटात कु. अंकिता अनंत खर्डेया तीन विद्यार्थ्यांची मुलाखतीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी निवड झाली. चैतन्य वैद्य यास दुसऱ्या टप्प्यात सिल्व्हर मेडल मिळाले व तिसऱ्या टप्प्यातील प्रकल्प

सादरीकरणासाठी निवड झाली. या विद्यार्थ्यांना विज्ञान शिक्षक व पालक यांनी मार्गदर्शन केले.

**क) विज्ञान मंच योजना** : या योजनेसाठी १३ विद्यार्थ्यांची यादी पाठविण्यात आली. त्यापैकी कु. नील सतीश लेले आणि कु. धनंजय किशोर गानू यांची शिबीरासाठी निवड झाली.

**ड) विज्ञान रंजन स्पर्धा** : या परीक्षेसाठी माध्यमिक गटात १२४ व प्राथमिक गटात ११० विद्यार्थी सहभागी झाले. माध्यमिक गटात श्रीम. पिलणकर आर. आर. व प्राथमिक गटात श्री. आगाशे श. श्री. यांनी मार्गदर्शन केले.

**इ) अखिल भारतीय विज्ञान मेळावा** : तालुका स्तरावर झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत कु. प्रमोद मारुलकर हा विद्यार्थी सहभागी झाला. या विद्यार्थ्यास श्रीम. पिलणकर व श्री. कांबळे के. डी.यांनी मार्गदर्शन केले.

नाणीजयेथे झालेल्या **प्रश्नमंजुषा** स्पर्धेत कु. अमेय राणे,कु. प्रतिक पाटील व कु. अनुप पेंणकर हे तीन विद्यार्थी सहभागी झाले.यासाठी शालांतर्गत प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करुन त्यातून तीन विद्यार्थ्यांची निवड केली. प्रकल्पासाठी माध्यमिक गटात कु.अविनाश रमेश गायकवाड, कु. सृष्टी वेल्हाळ व कु. माधुरी पंडीत सोनावणे या तीन विद्यार्थ्यांनी 'पावसाच्या पाण्याचे शेतीसाठी व्यवस्थापन' या विषयाचा प्रकल्प तयार करुन सहभाग घेतला.प्राथमिक गटात कु. अमेय नेरकर या विद्यार्थ्याने 'बहुपयोगी काठी'तयार करुन सहभाग घेतला. यासाठी विज्ञान शिक्षक श्री. पडवेकर यांनी मार्गदर्शन केले.

**ई) ओझोन दिन** : या दिनानिमित्त १६ सप्टेंबरला जयगड येथे झालेल्या निबंध स्पर्धेत गौरव पिलणकर यास तृतीय क्रमांकाचे बक्षिस मिळाले. प्रश्नमंजुषा स्पर्धेत हर्ष खेर व सुधांशु पाटील यांना तृतीय क्रमांकाचे बक्षिस मिळाले. भित्तीपत्र स्पर्धेत कु. मंजिरी पिलणकर ही विद्यार्थीनी सहभागी झाली होती.

**उ) सायन्स ऑलिंपीयाड स्पर्धा परीक्षा** : या स्पर्धेसाठी नववी मधील ५ तर दहावीमधील ४ असे एकूण ९ विद्यार्थी सहभागी झाले.

**ऊ) शालांतर्गत विज्ञान छंद मडळ** : या मंडळातर्फे विज्ञान वार्ताफलक, विज्ञान वार्ता चिकट वही, शोध व संशोधक संग्रह, बागेतील झाडांना शास्त्रीय नांवे देणे, काही रोगांची माहिती - कात्रण वही तयार करणे, औषधी वनस्पती माहिती संकलन, विज्ञान मॉडेल तयार करणे असे उपक्रम राबविण्यात येत आहेत. विज्ञान विषयक उपक्रम यशस्वी करण्यासाठी मा.मुख्याध्यापक, शाळेचे सर्व विज्ञान शिक्षक व पालक यांचे सहकार्य लाभले.

**८) महाराष्ट्र ज्ञानपीठ परीक्षा** - फेब्रुवारी २००८ मध्ये महाराष्ट्र ज्ञानपीठ परीक्षा घेण्यात आल्या. त्या परीक्षेसाठी इ. ५ वी व ७ वी मधील विद्याथी सहभागी झाले होते. त्या परीक्षांचा निकाल पुढीलप्रमाणे -

इ. ५ वी - परीक्षा दुसरी निकाल १००% कु. शेबवणेकर सुशाम शरद हा १००/१०० गुण मिळवून विद्यापीठात पहिला आला.

इ. ६ वी - परीक्षा तिसरी निकाल १००% कु. बागाव कौस्तुभ विजय ८७/१०० प्रशालेत पहिला.

इ. ७ वी - परीक्षा चौथी - निकाल १००% कु. गायकवाड अविनाश रमेश ९४/१०० प्रशालेत प्रथम. या परीक्षांना अनुक्रमे श्रीम. ढोले, सौ. अभ्यंकर व श्री. पडवेकर यांनी मार्गदर्शन केले.

**९) महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा** - द. २७ एप्रिल २००८ रोजी घेतल्या गेलेल्या महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेसाठी इ. ८ वी चे २५ तर इ. ९ वीचे १४ इ. विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते.

दि. १६ जून २००८ रोजी सदर परीक्षेचा निकाल जहीर झाला. या परीक्षेत विद्यार्थ्यांना पुढीलप्रमाणे यश मिळाले.

इयत्ता ८ वी : २५ पैकी २२ विद्यार्थी प्रमाणपत्रधारक तर

इयत्ता ९ वी : १४ पैकी १२ विद्यार्थी प्रमाणपत्रधारक ठरले. तसेच त्यातील दोन विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले.

शैक्षणिक वर्ष २००८-०९ मध्ये इ. ८ वी चे २४ तर इ. ९ वी चे २३, इ. १० वीचे ४० असे एकूण ८७ विद्यार्थी प्रविष्ठ झाले

आहेत. कोकण प्रज्ञा परीक्षेसाठी १४६ विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत.

राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेस इ. ८ वी चे १३ तर राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या मागास शिष्य. परीक्षेस इ. ८ वी चे १० विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत. मार्गदर्शक शिक्षक - श्री. के. डी. कांबळे, सौ. अभ्यंकर व श्री. बिरादार.

**१०) कलाविभाग** : शासकीय चित्रकला ग्रेड

परीक्षा : एलिमेंटरी चित्रकला ग्रेड परीक्षा - सहभागी विद्यार्थी : ४२,उत्तीर्ण : ३५ निकाल ८५.३७%

ए श्रेणीधारक : मयुरेश भोरे, अक्षता चव्हाण, अमृता जधव, प्रथमेश कांबळे, तेजस्विनी प्रभुदेसाई.

बी श्रेणीधारक : शितल देवरुखकर, ॲलिशा फर्नांडिस, अविनाश गायकवाड, प्राची गमरे, सूरजकांबळे, श्रध्दा पंडीत, ओंकार रहाटे, स्नेहल सावंत, सी श्रेणीधारक : योगेश अणेराव, मनीष बावीस्कर, तेजस चव्हाण, शुभम धनावडे, दिनेश गावडे, सूरज घवाळी, श्रुती जधव, शुभम जधव, सुशांत जधव, कश्मिरा कातळकर, अपूर्वा करंदीकर, तेजस कदम, किरण कर्लेकर, मानसी खेडेकर, मनाली मडकईकर, प्रतीक माळी, सायमी नाकाडे, स्मिता नांदुरकर, तेजस पाडाळकर, प्रसाद सावंत, ओं कार शिंदे, देवश्री शिंदे.

इंटरमिजीएट चित्रकला ग्रेड परीक्षा :

सहभागी विद्यार्थी: २३, उत्तीर्ण : २२ निकाल : ९५.६५%

ए श्रेणीधारक : वसुंधरा गायकवाडी, विजय गावडे, गार्गी जठार, अंकिता खर्डे, सुजय मोरे, प्रतिक पाटील, मंजिरी पिलणकर, ऋतुराजरावणंग,

बी श्रेणीधारक : दामिनी भिंगार्डे, नेहा मोंडकर,पल्लवी मिरकर, अमेय पांचाळ, मकरंद पुसाळकर, पूजा शिवलकर, रसिका सरवटे.
सी श्रेणीधारक : सौरभ गुरव, अनिकेत कुळ्ये, साईराज लांजेकर, हसीब मुलाणी, अभिजीत नागले, निखिल नाईक, सर्वेश वैद्य.
सहभागी विद्यार्थी: २६, उत्तीर्ण: २२ निकाल : ९१.६६%
ए श्रेणीधारक : वसुंधरा रमेश गायकवाड, विनय विलास गावडे, अंकिता अनंत खर्डे, अमेय रमाकांत पांचाळ, मंजिरी राजीव पिलणकर,
बी श्रेणीधारक : नलिनी दिलीप भिंगार्डे, गार्गी अनिल जठार, पल्लवी विजय मिरकर, अभिजीत मनोहर नागले, प्रतिक चंदर पाटील,मकरंद प्रितम पुसाळकर, ऋतुराजरमेश रावणंग.
इंटरमिजिएट चित्रकला ग्रेड परिक्षा :
सहभागी विद्यार्थी : १२, उत्तीर्ण : १२ निकाल : १००%
ए श्रेणीधारक : तन्वी नारायण गावडे, अक्षय अरुण जधव, संज्योती हरिश्चंद्र कातळकर, सिध्दार्थ मिलिंद पिलणकर,
बी श्रेणीधारक :हर्षल सुरेश भोपी, गिंताजली शशिकांत जेगले, सबीया निसार काद्री, रितोष प्रकाश कोळी, स्नेहा कृष्णा फाळके.
रत्नागिरी तालुका कलाध्यापक संघ आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धा :
सहभागी विद्यार्थी : २८६
गट क्र. ४ इ. ५ वी ते ६ वी : शिवानी शिवाजी सरगर - प्रदर्शनीय, मयुरी भरत भुवड - प्रदर्शनीय गटात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि इ. ७ वी ते ८ वी या गटात कु. प्राची अनिल गमरे हिने दुसरा क्रमांक मिळविला. इ. ९ वी ते १० वी या गटात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.
परीक्षेत ५ विद्यार्थ्यांना ए श्रेणी तर ८ विद्यार्थ्यांना प्राप्त झाली, इंटरमिजिएट परीक्षेत ८ विद्यार्थ्यांना तर ७ विद्यार्थ्यांना बी श्रेणी प्राप्त झाली, गतवर्षी एलिमेंटरी परीक्षेचा निकाल ९१.६६% व इंटरमिजिएट परीक्षेचा निकाल १००% लागला. शासकीय बालचित्रकला स्पर्धा, वन्यजीव सप्ताह आयोजित चित्रकला स्पर्धा आयोजित स्पर्धा इ. विविध स्पर्धेत अनेक विद्यार्थी सहभागी होतात. सामाजिक वनीकरण विभाग आयोजित जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेत इ. ८ वी ते १० वी या गटात कु. सिध्दार्थ मिलिंद पिलणकर ह्याने द्वितीय तर कु. तेजस्विनी राधाकृष्ण प्रभूदेसाई हिला उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त केला.

**११) बक्षिस विभाग :**
दरवर्षीप्रमाणे इ. १० वी गुणगौरव, माध्यमिक शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा सत्कार दि. २७/६/२००८ त्याचप्रमाणे ५ वी ते ९ वी तील विविध विभागातील तसेच क्रीडाक्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांना वेळोवेळी गौरविण्यात आले. या विभागाचे काम श्री. राजन रहाटेसर, श्री. गद्रे सर, सौ. गुरव मॅडम व श्रीम. पिलणकर मॅडम यांनी पाहिले.

**१२) राष्टीय हरित सेना विभाग :**
दि. २/१२/२००८ राष्टीय पर्यावरण प्रदुषण नियंत्रण दिन साजरा करण्यात आला. मार्गदर्शक म्हणून डॉ. सुरेंद्र ठाकुरदेसाई उपस्थित होते. तसेच वर्षभरातील महत्त्वाचे दिन साजरे केले जतात.

**१३) हिंदी भाषा विभाग :**
महाराष्ट राष्टभाषा पुणे रा. भा. बालबोधिनी फरवरी २००८ परीक्षेला बसलेले विद्यार्थी - ४५ एकूण निकाल - १००% प्रथम क्रमांक - कु. चैतन्य श्रीरंग वैद्य ८५/१००, द्वितीय क्रमांक - कु. चिन्मय बप्परंग भोसले, ८४/१००, कु. चिन्मय संजय भागवत ८४/१००, कु. सुप्रिया राजू गोसावी ८४/१००, तृतीय क्रमांक -कु. गिरीज अनिल सुर्वे ८३/१००. मार्गदर्शक सौ. कांबळे एस. के.रा. भा. प्राथमिक फरवरी २००८ परीक्षेला बसलेले विद्यार्थी - २७ एकूण निकाल -१००%
प्रथम क्रमांक - कु. प्रयाग धोंडू लोखंडे ८६/१००, द्वितीय क्रमांक - कु. नंदिनी विठ्ठल लोखंडे ८३/१००, कु. माधुरी राजेंद्र कोळी ८३/१००, तृतीय क्रमांक - कु. शुभदा दिलीप शिंदे ८१/१००. मार्गदर्शक - सौ. बागवे ए. एस.
रा. भा. प्रवेशिका फरवरी २००८ परीक्षेला बसलेले विद्यार्थी - २४ एकूण निकाल -१००%
प्रथम क्रमांक -कु. भक्ती नारायण प्रभू १६३/१००,
द्वितीय क्रमांक - कु. तेजस्विनी राधाकृष्ण प्रभूदेसाई १५१/२००, तृतीय क्रमांक-कु.सुकन्या सदाशिव शेष १५०/२००. मार्गदर्शक - श्री. आयरे एस. वाय.
रा. भा. सुबोध फरवरी २००८ परीक्षेला बसलेले विद्यार्थी - २५ एकूण निकाल -१००% प्रथम क्रमांक - कु. सुस्मिता सुर्यकांत जधव १३३/२००, द्वितीय क्रमांक - कु. योगिनी चंद्रशेखर पावसकर १३२/२०, तृतीय क्रमांक - कु. ऐश्वर्या मोरेशर रानडे १२२/२००. मार्गदर्शक - श्रीम. डोईफोडे एस. बी.

**१४) स्पर्धा विभाग -**
दरवर्षी प्रशालेध्ये शालेय, आंतरशालेय, स्थानिक,शासकिय पातळीवरील विविध मंडळांर्फत तसेच तालुका,जिल्हास्तरीय स्पर्धांध्ये विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होत असतात. तसेच उत्कृष्ठ यशही संपादन करीत असतात. या विविध स्पर्धांचा थोडक्यात घेतलेला हा आढावा.
*जनेवारी २००८ मध्ये आपल्याच संस्थेर्फत 'पर्यावरण' विषयावरील प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये इ.९वी तील तीन विद्यार्थीनींचा सहभाग होता.
* पतितपावन मंदिर संस्थेर्फत घेण्यात आलेल्या 'क्रांतीकारक व्यक्ती रेखा' वेशभूषा स्पर्धेत एकूण ५ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यातील कु. तेजस चव्हाण या विद्यार्थीनीला द्वितीय क्रमांक मिळाला. ही स्पर्धा स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त सावरकर नाट्यगृहामध्ये दि. २६ फेब्रुवारी २००८रोजी घेण्यात आली होती.

* कै.अरुअप्पा जेशी प्रथम स्मृतीदिनानिमित्त निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती त्यामध्ये इ. ५ वी ते ७ वीतून १४ तसेच ८वी ते १० वी च्या ६३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता तसेच २ शिक्षकांचा सुद्धा यामध्ये सहभाग होता. याही स्पर्धेत कु. अंकिता डेरे या विद्यार्थीनीच्या निबंधाला प्रथम क्रमांक मिळाला. 'संकल्प' आयोजित 'क्रांतिकारक भित्तीचित्र' स्पर्धा घेण्यात आली त्यामध्ये ५६ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. यामधून पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविलेले विद्यार्थी अमेय राणे व अवधूत मुळ्ये हे आहेत.

* ज्ञानवर्धिनी ॲकेडमी व रा.भा. शिर्के गुरुकूल प्रकल्प,रत्नागिरी वाचकन्वी स्मार्ट स्पर्धा परीक्षा दि. ३० मार्च २००८ रोजी घेण्यात आली. त्यामध्ये बहुसंख्य विद्यार्थी सहभागी झालेले होते व त्यांनी भरघोस यशही संपादन केले.

* दि. १७ मार्च २००८ रोजी राष्ट्र सेवा दल, जकादेवी यांच्यावतीने तालुका स्तरीय निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये १६ विद्यार्थ्यांचे निबंध पाठविण्यात आले होते. पैकी आयोजित केलेल्या तेजल चव्हाण हिच्या निबंधाला प्रथम क्रमांक प्राप्त झाला.

*यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तर्फे जगतिक ग्रंथालयदिनानिमित्त आयोजित निबंध स्पर्धेत इ. ८ वी ते १० मधील अनेक विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

*कै. श्रीमती शांताबाई भिडे स्मृती प्रित्यर्थ राष्ट्रसेविका समिती, रत्नागिरीतर्फे घेण्यात आलेल्या स्फूर्तीगीत गायन स्पर्धेत १५ विद्यार्थी सहभागी झाले होते त्यामध्ये विद्यार्थ्यांना प्रथम व द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. ही स्पर्धा २६ जून ०८ रोजी गुरुकृपा मंगल कार्यालय, रत्नागिरी येथे पार पडली.

* उपविभागीय वनअधिकार मार्केंडी, चिपळूण तर्फे वन्यजीवसप्ताहनिमित्त आयोजित निबंध व चित्रकला स्पर्धेध्ये इ. ५ वी ते १०वीच्य १९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यात इ. १० वीच्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेसाठी प्रियांका तुपे हिची निवड झाली.

* गीतामंडळ, रत्नागिरी ६५ वा गीता जयंती उत्सवानिमित्त सुलेखन, निबंध, चित्रकला, पठण, सुर्यनमस्कार, योगासन व रांगोळी अशा विविध स्पर्धांध्ये बहुसंख्य विद्यार्थ्यांचा सहभाग असून यशही संपादन केले आहे.

*बालदिनानिमित्त शहर वाचनालय, शिवाजीनगर, रत्नागिरीतर्फे घेण्यात आलेल्या कथाकथन व नाट्यवाचन स्पर्धेत इ.५ वी ते ७ वी तील व ८ वी ते १० वीतील प्रत्येक गटासाठी २/२विद्यार्थ्यांची निवड करुन पाठविलेली होती त्यामध्ये छोट्या गटात नाट्यवाचनात व कथाकथनामध्ये ही प्रथम क्रमांक मिळाला असून मोठ्या गटात कथाकथन व नाट्यवाचन स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळाला. ही स्पर्धा २३/११/२००८ रोजी शहर वाचनालय येथे झाली.

* रत्नागिरी जिल्हा माध्य. अध्यापक संघ, माध्य. विभाग जि प. रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने कॉम्प्युटर जनरल नॉलेज स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये सुद्धा अनेक विद्यार्थी सहभागी झाले होते.

* गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती रत्नागिरतर्फे ऊर्जसंवर्धन राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय वादविवाद स्पर्धा घेण्यात आल्या त्यामध्ये इ. ८ वी ते १० वी तील विद्यार्थ्यांचा सहभाग होता.ही स्पर्धा १७/१२/२००८ रोजे घेण्यात आली.

* दि. २३/१२/२००८ रोजे स्वामी स्वरुपानंद सेवा मंडळ, पावस तर्फे घेण्यात आलेल्या वक्तृत्व व पाठांतर स्पर्धेत प्रत्येक गटासाठी २/२ विद्यार्थी सहभागी झाले होते. गट क्र.१ मधील कु. आसावरी आखाडे हिला द्वितीय क्रमांकाचे बक्षिस, प्रशस्तीपत्रक व स्मृतीचिन्ह मिळाले.

* नगर परिषद रत्नागिरी तर्फे लो. टिळक पुण्यतिथी निमित्त विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या त्यामध्ये इ. ५ वी ते ९वी मधील बहुसंख्य विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

* रत्नागिरी एज्युकेशन सोसायटी रत्नागिरीतर्फे घेण्यात आलेल्या आंतरशालेय पाठांतर, सुलेखन, शुद्धलेखन स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**१५) एन.सी.सी. विभाग -**

या शैक्षणिक वर्षात ८वी व ९वी तील एकूण ३४ छात्र व १६ छात्र एकूण ५० छात्र सहभागी झाले आहेत.पी. ओ. कॅडेट म्हणून कु. प्रतिक पाटील, सौरभ चव्हाण,भाग्यश्री पोळेकर तर ओव्हरऑल बेस्ट कॅडेट म्हणून पी.ओ.कॅडेट कु. प्रतिक पाटील यांची निवड झाली. लिडींग कॅडेट म्हणून तुषार काशिद, श्रीपाद कोळी, गार्गी जठार यांची निवड झाली. प्रथम वर्ष लिडींग कॅडेट म्हणून पुष्कर हेळेकर, किरण मोरे व माधुरी सोनावणे यांची निवड झाली. एन.सी.सी विभाग प्रमुख-चीफ ऑफिसर म्हणून पाटील सी.एम. काम पाहतात. शाळेच्या परिसरात फळझाडांची लागवड संदिप तावडे यांच्या शुभहस्ते करण्यात आली. ए.टी.सी कॅम्पचे आयोजन कमांडिक ऑफीसर एम. मयांक साहेबानी केले होते. या कॅम्पमध्ये घेतलेल्या विविध स्पर्धांध्ये या प्रशालेतील विद्यार्थ्यांनी पुढीलप्रमाणे यश प्राप्त केले. ड्रील- प्रथम क्रमांक ,लाईन एरिया - द्वितीय क्रमांक, ग्रुप डान्स - प्रथम क्रमांक,वैयक्तीक नृत्य- प्रथम क्रमांक , बेस्ट सोफोर - द्वितीय क्रमांक,३० नोव्हेंबर रोजे एन.सी.सी डे साजरा करण्यात आला. या दिवशी पी. ओ. कॅडेट कु. प्रतिक पाटील यांच्या नेतृत्वाखाली शानदार संचालन करुन प्रमुख अतिथी र.ए.सोसायटीचे कार्याध्यक्ष मान. श्री.रमेश कीर साहेबांना मानवंदना करण्यात आली. विद्यालयात स्काऊट गाईड विभाग कार्यरत आहे. सोफार फ्लॅगच्या सहाय्याने एन.सी.सी. छात्रांनी पाहुण्याचे स्वागत केले. खेड-रसाळगड येथील धोलाई व जगबाई मंदिर परिसर श्रमदानाने स्वच्छ केला. मुंबई आतंकवादी हल्ल्यात धारातीर्थ पडलेल्या पोलिस अधिकारी, जवान व नागरिकांना जयस्तंभ येथे एन.सी.सी छात्रांनी श्रद्धांजली वाहिली. पल्स पोलिओ जनजगरण जनजगृती प्रभात फेरीत सहभाग घेतला.

**१६) महाराष्ट्र छात्र सेना विभाग -**

महाराष्ट्र छात्र सेना विभागामध्ये इ.८वी चे १११ तर ९ वी चे ९८ असे एकूण २०९ विद्यार्थी आहेत. १५ ऑगस्ट प्रजसत्ताक दिन, पोलीस ग्राऊंड परेड मैदानावरती संचलनात सहभागी, जिल्हा ध्वजदिन निधी संकलन कार्यक्रम स्वागत गीत, गार्ड ऑफ ऑनरसाठी उपस्थिती, मुंबई बॉम्बस्फोटमधील हुतात्मा जवानांना श्रद्धांजली कार्यक्रम जयस्तंभ येथे आयोजित रॅली मध्ये १०० विद्यार्थी सहभागी झाले होते. तसेच शाळा परिसर स्वच्छता मध्येही विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

**१७) गरीब विद्यार्थी निधी -**

प्रशालेती गरीब होतकरु विद्यार्थ्यांना आर्थिक वा वस्तुरुप सहाय्य करुन शिक्षणाला हातभार लावण्याचे काम गरीब विद्यार्थी निधीतर्फे गेली अनेक वर्षेसातत्याने करण्यात येते. यावर्षी २६ विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, वह्या व ४० जणांना शुल्क असे आजपर्यंत सुरे १५ ते १६ हजर रुपयांची मदत देण्यात आली होती. या विभागाचे श्री देवळेकर सर काम पाहतात.

**१८) स्काऊट गाईड विभाग -**

प्रशालेतील स्काऊट गाईड विभाग एक वैशिष्ट्यपूर्ण विभाग आहे. निसर्ग शिबीर, जिल्हा मेळावा इ. कार्यक्रमात विद्यार्थी सहभागी होतात. यावर्षी फणसोप, रत्नागिरी येथे संपन्न झालेल्या जिल्हा मेळाव्यात स्काऊट गाईडसनी सहभागी होऊन काही प्रावीण्य पदकेही पटकावली आहेत. खरी कमाई संकलन व सर्वाधिक पथक नोंदणी बाबत दोन बक्षिसे प्रशालेला प्राप्त झाली आहेत. स्काऊट गाईड संस्थेचे मुख्यालय आयुक्त म्हणून प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. कांबळे व जिल्हा सचिव म्हणून श्री. देवळेकर हे दोघेही कार्यरत आहेत. यावर्षी श्रीमती शिर्के निवृत्त झाल्यामुळे सौ. दुदगीकर यांची गाईड शिक्षिका म्हणून निवड झाली.

**१९) शिक्षक पालक संघ विभाग -**

शिक्षण क्षेत्रात शिक्षक-पालक संबंधांना खूप महत्त्व आहे.दोन्ही घटकांच्या एकत्रित प्रयत्नातून प्रत्येक विद्यार्थ्यांचे शिक्षण योग्य दिशेन होत असते. प्रशालेत शिक्षक-पालक संघही सक्रिय असून एकत्रित सभा व वर्गवार सभा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडतात. या संघाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. कांबळेसर तर सचिव म्हणून श्री. देवळेकर सर काम पाहतात.

**२०) स्वराज्य सभा विभाग -**

सन २००८-२००९ या शैक्षणिक वर्षात विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन यशस्वीरित्या करण्यात आले.शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला दि. १० जुलै रोजी स्वराज्य सभांतर्गत विद्यार्थी प्रतिनिधींची निवडणूक घेण्यात आली. यामध्ये प्रत्येक वर्गांतून विद्यार्थी व विद्यार्थीनी प्रतिनिधी निवडण्यात आले.त्याचबरोबर इ. १० वीच्या सर्व तुकड्यांधून जनरल सेक्रेटरी पदाची निवडणूक घेण्यात आली. त्यात कु. भाग्यश्री भिडे व कु. मानस पवार हे विद्यार्थी विजयी झाले.

दि. ११ जुलै रोजी जगतिक लोकसंख्या इशारा दिन साजरा करण्यात आला. सकाळ सत्रामध्ये सहा. शिक्षिका सौ. बागवे व दुपार सत्रामध्ये पर्यवेक्षिका सौ. गांधी मॅडम यांनी मार्गदर्शन केले.

१८ जुलै रोजी दोन्ही सत्रामध्ये गुरुपौर्णिा साजरी करण्यात आली. दुपार सत्रातील कार्यक्रमाचे प्रतिनिधित्व इ. ९ वी (अ) या वर्गाने केले.

दि. १ ऑगस्ट रोजी लो. टिळक पुण्यतिथी दोन्ही सत्रामध्ये साजरी करण्यात आली. सकाळ सत्रामध्ये आकाशवाणी निवेदिका सौ. निशा काळे व दुपार सत्रामध्ये श्री. गीते सर यांनी मार्गदर्शन केले.

दि. ९ ऑगस्ट रोजी क्रांतीदिन साजरा करण्यात आला.सकाळ सत्रामध्ये सहा. शिक्षक श्री. आयरे व दुपार सत्रामध्ये श्रीम.गुरव व श्री. माळगे यांनी मार्गदर्शन केले.

दि.१५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिन सोहळा प्रशालेत संपन्न झाला. सकाळी ठीक ७.३० ला ध्वजरोहण झाले. मुख्याध्यापक श्री.कांबळे एस.एम. यांनी यावेळी मार्गदर्शन केले. प्रशालेच्या सर्व शाखांच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर केली.

दि. १६ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन व संस्कृत दिन दोन्ही सत्रांध्ये साजरा करण्यात आला. या साठी सकाळ सत्रामध्ये प्राध्यापक डॉ. श्रीकृष्ण जेशी व दुपार सत्रामध्ये सौ. स्मिता राजवाडे (लेखिका) उपस्थित होत्या. या कार्यक्रमाच्या अनुशंगाने त्यांनी मार्गदर्शन केले.

दि. २ ऑक्टोबर रोजी म. गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी प्रशालेच्या आवारात श्रमदान केले. त्यानंतर सकाळ सत्रातील सहा.शिक्षक श्री. जधव व दुपार सत्रातील श्री. गद्रे यांनी मार्गदर्शन केले.

दि. २० डिसेंबर रोजी स्वयंशासन दिन साजरा करण्यात आला. इ. १० वीच्या विद्यार्थ्यांना अध्यापन केले. यावेळी काही पालक, माजी शिक्षक व मान्यवरांनी भेट दिली.सर्वच कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.या कार्यक्रमांसाठी मा. मुख्याध्यापक, पर्यवेक्षिका,शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी व सेवक वर्ग यांचे सहकार्य लाभले.स्वराज्य सभा म्हणून सौ. पाटील एस. एन. व सौ.साखळकर एस. डी. तर सांस्कृतिक विभाग प्रमुख म्हणून श्रीम.जधव पी. एस. व सौ. बागवे ए. एस. काम पाहतात.

**२१) विशेष कार्यक्रम -**

या शैक्षणिक वर्षात आमच्या प्रशालेत सह्याद्री वाहिनीच्या प्रसिद्ध 'चालता बोलता' कार्यक्रमाचे चित्रिकरण करण्यात आले. ह्या कार्यक्रमांतर्गत प्रशालेतील विद्यार्थीनींनी *सर्व शिक्षा अभियान* या विषयावर लावणी नृत्य सादर केले. या कार्यक्रमाचे नियोजन श्री.के.डी.कांबळे यांनी प्रशालेची माहिती विषद केली. सदर लावणीचे सादरीकरण व प्रक्षेपण सह्याद्री वाहिनीवरुन दि. २२/०९/०८ रोजी केले गेले. सदर प्रक्षेपण सर्व विद्यार्थ्यांना पाहत येण्याची सोय प्रशालोर्फत केली गेली.

दि. १० डिसेंबर २००८ रोजी अल्पबचत सभागृह येथे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातर्फे सशस्त्र सेना दिन हा झेंडा दिन म्हणून साजरा केला जतो. सदर कार्यक्रमासाठी प्रशालेतील विद्यार्थ्यांनी नुकत्याच मुंबईवर झालेल्या अतिरेक्यांच्या हल्ल्यात शहिद झालेल्या ज्ञात अज्ञात व्यक्तींसाठी श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी देशभक्तीपर गीते सादर केली. ती पुढील प्रमाणे -
१) ऐ मेरे वतन के लोगो - कु. तेजस्वीनी प्रभुदेसाई
२) कर चले हम फिदा - कु. लईक बुड्ये व अन्य सहकारी विद्यार्थी. सदर विद्यार्थ्यांना के. डी. कांबळे यांनी मार्गदर्शन केले.

**२२) सालसेप विभाग**

शुक्रवार दि. ५/१२/२००८ रोजी किशोरवयीन मुलामुलींना मार्गदर्शनांतर्गत *पौगडावस्थेत मुला-मुलींमध्ये होणारे मानसिक व भावनिक बदल* या संदर्भात सिव्हील हॉस्पीटलच्या सौ.पोतदार मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इ८वी ते १० वी चे विद्यार्थी यासाठी हजर होते. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारुन अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने चांगला प्रतिसाद मिळाला.

**२३) परीक्षा विभाग**

परिक्षा विभागामार्फत चाचणी परिक्षा, सत्रांत १ आणि २ परीक्षा तसेच इ. १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी सराव परीक्षेचे नियोजन आणि कार्यवाही करण्यात येते. परीक्षा विभागाचे काम सकाळ सत्र श्री. शेलार सर आणि दुपार सत्र श्री. पोवार सर हे पाहतात.

**२४) क्रीडा विभाग -**

या शैक्षणिक वर्षाध्ये आमच्या प्रशालेचे विद्यार्थी फुटबॉल, व्हॉलीबॉल, खो-खो, मैदानी स्पर्धा, बास्केटबॉल, बॅडमिंटन, क्रिकेट, कुस्ती, कॅरम, बुद्धीबळ, कबड्डी, इ. खेळामध्ये आमच्या प्रशालेच्या संघाने सहभागी होऊन विशेष प्राविण्य संपादन केले आहे.विविध शासकीय क्रीडा स्पर्धा व रत्नागिरी जिल्हा असोसिएशन क्रीडा स्पर्धा

* १४ वर्षाखालील सुब्रतो मुखर्जे फुटबॉल - जिल्हा उपविजयी
* १६ वर्षाखालील साई फुटबॉल - जिल्हा उपविजयी
* १४ वर्षाखालील शालेय फुटबॉल - जिल्हा उपविजयी
* १७ वर्षाखालील शालेय फुटबॉल - जिल्हा उपविजयी
* १४ वर्षाखालील शालेय कुस्ती - ५ मुलगे जिल्हा उपविजयी, १ मुलगा जिल्हा विजयी
* १६ वर्षाखालील साई कुस्ती - १ मुलगा जिल्हा विजयी
* १२ वर्षाखालील मॅरेथॉन - १) दिव्या भोरे - द्वितीय क्रमांक - जिल्हास्तर
२) सोनिया भोसले तृतीय क्रमांक - जिल्हास्तर
* कॅरम १४ वर्षाखालील मुलगे जिल्हा स्तरीय - १ प्रथमेश शिवलकर (७वी ड)
प्रथम क्रमांक २. सौरभ महाकाळ (८वी अ) द्वितीय क्रमांक, प्रथमेश नाचणकर (५ वी अ) पाचवा क्रमांक.
* कॅरम १७ वर्षाखालील मुली जिल्हास्तरीय - १ मैत्रेयी गोगटे (९वी अ) प्रथम क्रमांक, २ स्नेहा फाळके (१० वी अ) -द्वितीय क्रमांक, ३ तृप्ती जेटकाळे(९वी अ) तृतीय क्रमांक
* हॉकी, १४ वर्षाखालील शालेय व १५ वर्षाखालील नेहरु ट्रॉफी जिल्हास्तरीय दोन्ही संघ जिल्हा उपविजयी
* बॅडमिंटन १४ वर्षाखालील व १७ वर्षाखालील मुली जिल्हास्तरीय स्पर्धा - जिल्हा विजयी
* हॅंडबॉल १४ वर्षाखालील मुली जलतरण व १७ वर्षाखालील मुली शालेय जिल्हास्तरीय उप विजयी
*१४ वर्षाखालील मुली जलतरण - ५० व १००
बॅकस्ट्रोक प्रथम क्रमांक जई केळकर (८ वी अ), ५० मीटर फ्री स्टाईल द्वितीय क्रमांक
* बुद्धीबळ १४ वर्षाखालील मुले/मुली -पुष्कर हिर्लेकर चौथा क्रमांक, सुप्रिया - चौथा क्रमांक जिल्हा विजयी * मैदानी स्पर्धा १४ वर्षा खालील मुले/मुली तालुकास्तरीय - शिवराजठिक १०० मी. - तृतीय क्रमांक, प्रज्योत जधव २०० मी.द्वितीय क्रमांक, ४x१०० रिले प्रथम क्रमांक, आरती कांबळे १००मी.-द्वितीय क्र. क्षितीज भागवत १०० मी. - तृतीय क्रमांक, आरती कांबळे १०० मी-तृतीय क्रमांक, प्रिया सावंत ४०० मी द्वितीय क्रमांक, गौरी गवळी - गोळा फेक द्वितीय क्रमांक, ४x१०० रिले प्रथम क्रमांक.
मैदानी स्पर्धा - १७ वर्षाखालील मुले/मुली तालुकास्तरीय - गंधार खामकर १०० मी - लॉंगजंप -द्वितीय क्रमांक, ४x१०० रिले द्वितीय क्रमांक
* बास्केट बॉल - १४ वर्षाखालील मुली व १७ वर्षाखालील मुले - जिल्हा उपविजयी
* तलवारबाजी १४ वर्षाखालील मुले/ मुली - दिनकर राऊत, आदित्य राऊत, विद्या विचारे जिल्हास्तर विजयी * कराटे १४ वर्षाखालील मुलगे - रोहित जमादार जिल्हा विजयी
* बॅडमिंटन - १७ वर्षा खालील मुली विजयी - राज्य स्तरीय स्पर्धेसाठी निवड- मानसी सुर्वे(९वी अ), प्रेषिता घळसासी (९वी अ), स्नेहल सावंत
* फुटबॉल - विभागीय स्पर्धेसाठी १४ वर्षाखालील मुलगे सहभागी
* क्रिकेट - १४ वर्षाखालील मुलगे जिल्हा विजयी होऊन सांगली येथे विभागीय स्पर्धेत सहभाग
* मैदानी स्पर्धा - १४ वर्षाखालील मुले/मुली जिल्हास्तर विजयी होऊन सातारा येथे विभागीय स्पर्धेत सहभाग. ४x१०० रिले जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक (मुले), प्रिया सावंत-जिल्हास्तरीय दुसरा क्रमांक, ४x१०० रिले जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक (मुली),गोळाफेक - जिल्हा स्तरीय प्रथम क्रमांक
* कॅरम - १४ वर्षाखालील मुलगे विभागीय स्पर्धेत विजयी होऊन राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. प्रथमेश शिवलकर प्रथम क्रमांक, प्रथमेश नाचणकर द्वितीय क्रमांक , सौरभ महाकाळ तृतीय क्रमांक

* कॅरम - १७ वर्षाखालील मुली विभागीय स्पर्धेत विजयी होऊन राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. मैत्रेयी गोगटे (९वी अ) प्रथम क्रमांक, स्नेहा फाळके (१० वी अ) द्वितीय क्रमांक,तृप्ती बेटकाळै (९ वी अ) तृतीय क्रमांक

* कबड्डी - कुमार गट मुलींच्या रत्नागिरी जिल्ह्याच्या कबड्डी संघात दोघींची निवड होऊन राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत सहभाग, संजेवनी कांबळे (१०वी क), निलम चव्हाण(१०वी क).

मैदानी स्पर्धा - मैदानी स्पर्धेत रत्नागिरी जिल्ह्याच्या संघातून पूणे येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तीन मुलांची निवड. मानस पवार (१०वी अ), गंधार खामकर चव्हाण,(१० वी ब), आरती कांबळे (७वी क).

* बॅडमिंटन - पूणे येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत १६ वर्षाखालील मुलींमध्ये दुहेरी मुकूट - स्नेहल सावंत.

* खो-खो - रत्नागिरी जिल्ह्याच्या खो-खो संघात ठाणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी एका मुलाची निवड - प्रितक किनरे (१० ब)

* कॅरम - रत्नागिरी जिल्ह्याच्या कॅरम संघात तीन मुलांनी विजय संपादन करुन राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होऊन त्यांची निवड राष्ट्रीय स्पर्धेसाठी करण्यात आली.

मैत्रेयी गोगटे (९वी अ), तृप्ती बेटक्याळे (९ वी अ), प्रथमेश शिवलकर (७वी ड)

* यश फाऊंडेशन आयोजित अटल क्रीडा महोत्सव स्पर्धेत प्रशालेने विविध क्रीडा स्पर्धांत सहभागी होऊन सर्वाधिक बक्षिसे मिळवून अटल क्रीडा नैपुण्यपद मिळविले.

* उमेश शेट्ये यांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या विविध क्रीडा स्पर्धेत प्रशालेचे खेळाडू विद्यार्थी सहभागी होऊन ७२ शिल्ड प्रशालेला मिळवून दिली.

* दरवर्षी प्रमाणे प्रशालेचा वार्षिक क्रीडामहोत्सव संपन्न झाला. यामध्ये फुटबॉल,व्हॉलीबॉल, क्रिकेट बास्केटबॉल, बुद्धीबळ, लगोरी, लंगडी इ. खेळांचा समावेश करण्यात आला.

* राष्ट्रीय स्तरावर : कॅरमसाठी कु. मैत्रेयी राजन गोगटे व तृप्ती बेटक्याळे, प्रथमेश शिवलकर तर बॅडमिंटनसाठी स्नेहल सावंत.

* राज्यस्तरीतय : क्रिकेटसाठी आकाश सावंत, मकरंद पारकर, सौरभ महाकाळ, प्रथमेश नाचणकर याची, कबड्डीमध्ये संजेवनी कांबळे, निलम चव्हाण यांची, कॅरमसाठी प्रथमेश नाचणकर, प्रथमेश शिवलकर, सौरभ महाकाळ, मैत्रेयी गोगटे, तृप्ती बेटक्याळे, स्नेहा फाळके, कराटेसाठी कु. शरयू रविंद्र केळकर हिची तसेच बॅडमिंटनसाठी कु. मानसी सुर्वेव कु. प्रेषिता घळसासी, स्नेहल सावंत यांची कबड्डीसाठी संजेवनी कांबळे, खो-खो साठी आरती कांबळे, प्रिया सावंत व प्रतिक किनरे यांची निवड झाली.

**२४) कोकण प्रज्ञा शोध परीक्षा** :

शैक्षणिक वर्ष २००७-०८ मध्ये घेण्यात आलेल्या या परीक्षेसाठी ११ विद्यार्थी प्रविष्ठ झाले. परिक्षेचा निकाल ४२.३७% इतका लागला. या परीक्षेध्ये प्रशालेतील पाच विद्यार्थी बक्षिस पात्रठरले तर सत्तेचाळीस विद्यार्थी प्रमाणपत्रधारक ठरले.चालू शैक्षणिक वर्षी घेण्यात आलेल्या या परीक्षेसाठी १४६ विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत. सदर परीक्षेचे काम श्री. बिरादार, श्री.गद्रे, श्री.कांबळे, आर. वाय यांनी पाहिले.

महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा -

परीक्षेसाठी इ. ८वी चे २४ तर इ.९वी चे २३ इ. १०वी चे ४० विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत.